सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २८४ | सोमवार, दि. ६ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४५३००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३३६००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११००००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३८०/-
भाव प्रती १० ग्रॅम








अमळनेर : संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थानाच्या मंदिरास भीषण आग लागल्याने मोठे नुकसान झाले. त्यानंतर शनिवार, दि. ४ जुलै रोजी सायंकाळी या नुकसानीची पाहणी करताना आमदार अनिलदादा पाटील. शेजारी तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, बांधकाम विभागाचे अधिकारी, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे, संस्थानाचे राजेंद्र भामरे, महेश कोठावदे, उदय देशपांडे, अतुल कुलकर्णी यासह नगरसेवक, राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार. दुसऱ्या छायाचित्रात भडगाव येथे प्रत्यक्ष वारीत जाऊन प. पू. प्रसाद महाराजांची भेट घेऊन मंदिराच्या आगीसंदर्भात सविस्तर चर्चा करताना आमदार पाटील.

# श्री विठ्ठलाच्या कृपाशीर्वादातून वाडी मंदिराचे होणार नवनिर्माण

## आमदार अनिलदादा पाटील यांची वाडी मंदिरास भेट; वारीत जाऊन प. पू. प्रसाद महाराजांशीही केली चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्री विठ्ठल-रखुमाईंचा कृपाशीर्वाद आणि शासनाची मदत यातून येथील संत श्री सखाराम महाराज वाडी मंदिराचे नवनिर्माण होऊन वारकरी संप्रदायातील हे प्रमुख धार्मिक स्थळ लवकरच आणखी तेजाने खुलेल, अशी भावना आमदार अनिलदादा पाटील यांनी वाडी मंदिराच्या भेटीप्रसंगी व्यक्त केली.

या भेटीनंतर त्यांनी भडगाव येथे प्रत्यक्ष वारीत जाऊन प. पू. प्रसाद महाराजांची भेट घेऊन मंदिराच्या आगीसंदर्भात सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांच्यासमवेत मंदिराचे विश्वस्त व बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तत्पूर्वी, संपूर्ण मंदिर परिसराच्या पाहणीप्रसंगी आमदार पाटील म्हणाले, की हे मंदिर अमळनेरच नव्हे; तर संपूर्ण महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान असून, लवकरात लवकर त्याचे नवनिर्माण व्हावे, यासाठी प्रयत्नशील आहे. हे संस्थान पर्यटन विभागांतर्गत 'ब' वर्गात असून, याच विभागाच्या माध्यमातून निधी मिळवू. त्यासोबतच 'अ' वर्ग करण्यासाठीही प्रयत्न करून राज्य शासनाकडून जास्तीत जास्त निधी मिळविण्यासाठी शिखर संस्थेपर्यंत जाऊ. त्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या कामाला तातडीने लागावे, अशी सूचना आमदारांनी तहसीलदार रूपेशकुमार सुराणा व बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. विश्वस्त मंडळाशीही त्यांनी पुढील हालचालींबाबत चर्चा करून घटनेच्या दिवशी दाखविलेल्या तत्परतेबद्दल त्यांनी अग्नीशमन विभागाचे कौतुक केले. यावेळी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे, संस्थानाचे राजेंद्र भामरे, महेश कोठावदे, उदय देशपांडे, अतुल कुलकर्णी यासह नगरसेवक, राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार उपस्थित होते.

### उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवारांकडून महाराजांशी संवाद

या दुर्घटनेमुळे अमळनेर येथील वाडी संस्थानच्या ऐतिहासिक, धार्मिक व आध्यात्मिक वारशाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, लाखो वारकरी आणि भाविकांच्या भावना या घटनेमुळे व्यथित झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मंदिराच्या नवनिर्माणासाठी शासन नक्कीच मदत करेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांनी प. पू. प्रसाद महाराजांना दिली. आमदार पाटील हे प. पू. प्रसाद महाराजांना भेटण्यासाठी भडगाव येथे गेले असता त्यांच्या मोबाईलवरून श्रीमती पवार यांनी महाराजांशी संवाद साधला. आमदार पाटील यांनी महाराजांना माहिती देताना सांगितले, की मुंबईत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन संस्थानाच्या पुनर्बांधणीसाठी विशेष बाब म्हणून १५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच विधिमंडळातही पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन उपस्थित करून शासनाकडे आपत्कालीन निधीची मागणी केली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि शासन याबाबत सकारात्मक आहे. महाराजांनी देखील साक्षात विठूमाऊली व लाखो भक्तगण आपल्यासोबत असल्याने चिंता नसल्याचे सांगितले.


# 'एसआयआर' मोहिमेला गती; 'बीएलओं'च्या दारी अधिकारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम शासनाने गांभीर्याने हाती घेतला असून, २९ जुलै २०२६ पर्यंत ही मोहीम पूर्णत्वास नेण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. त्यामुळे 'बीएलओं'वरील वाढता ताण कमी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी थेट त्यांच्या घरी जाऊन कामाचा आढावा घेण्यास सुरूवात केली आहे. तसेच या कामामुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत असल्याने शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला असून, शिक्षकांची विविध प्रशिक्षणेही पुढे ढकलण्यात आली आहेत.

याबाबतची माहिती अशी, की मृत मतदारांची नावे वगळणे, १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवीन मतदारांची नावे समाविष्ट करणे तसेच २००२

पान २ वर







**दिनविशेष**
६ जुलै

- दादाभाई नौरोजी, ब्रिटिश संसदेवर निवडून आलेले पहिले भारतीय.
- भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेची पुण्यात स्थापना झाली.
- पुणे-मुंबई मार्गावरील खंडाळा आणि मंकी हिल दरम्यान भारतातील सर्वात लांब (तत्कालीन) रेल्वे मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## संपादकीय

### शेताच्या मातीत राबणाऱ्या हातांना अखेर न्याय!

महाराष्ट्राने पुन्हा एकदा देशाला दिशा दाखविली आहे. शेताच्या बांधावर आयुष्य घालविणाऱ्या, उन्हातान्हात घाम गाळणाऱ्या, पिकाच्या प्रत्येक कणात स्वतःचे श्रम मिसळणाऱ्या लाखो महिलांना अखेर 'शेतकरी' म्हणून कायदेशीर ओळख मिळण्याचा ऐतिहासिक क्षण राज्याने अनुभवला आहे. महिला शेतकरी विधेयक २०२६ विधानसभेत एकमताने मंजूर होणे हा केवळ कायदा नाही, तर शतकानुशतके दुर्लक्षित राहिलेल्या स्त्रीश्रमाचा सन्मान आहे. हे विधेयक महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातील मैलाचा दगड ठरणार आहे. आजवर शेतीत सर्वाधिक श्रम करणारी व्यक्ती अनेकदा महिला असायची; मात्र सातबाऱ्यावर नाव नसल्यामुळे तिची ओळख 'शेतकरी' म्हणून नव्हती. ती पहाटेपासून रात्रीपर्यंत शेतात राबायची, बी पेरायची, निंदणी–खुरपणी करायची, जनावरांची देखभाल करायची, कापणीपासून मळणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर खांद्याला खांदा लावून उभी राहायची; पण सरकारी कागदावर ती केवळ 'शेतकऱ्याची पत्नी' किंवा 'मजूर' म्हणूनच ओळखली जायची. तिच्या श्रमाला मान नव्हता, अधिकार नव्हता आणि सन्मानही नव्हता. ही विसंगती दूर करण्याचे धाडस महाराष्ट्राने दाखविले आहे. या विधेयकामुळे केवळ शेतीच नव्हे, तर मासेमारी, कुक्कुटपालन, पशुपालन आणि गौण वनउत्पादन गोळा करणाऱ्या महिलांनाही शेतकरी म्हणून अधिकृत मान्यता मिळणार आहे.

सुमारे एक ते सव्वा कोटी महिलांना या कायद्याचा लाभ होणार आहे. ही संख्या केवळ आकडा नसून महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या स्त्रीशक्तीचे प्रतिनिधित्व करते. या कायद्याचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तो केवळ सन्मान देत नाही, तर अधिकारही दतो. महिला शेतकरी म्हणून प्रमाणपत्र मिळाल्यानंतर बँक कर्ज, पीकविमा, कृषी अनुदान, शासनाच्या विविध योजना, आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याचे दरवाजे महिलांसाठी उघडणार आहेत. राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांमध्ये ३० टक्के लाभ मिळण्याचा मार्गही सुकर होणार आहे. यामुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक बळकट होईल. आजवर अनेक महिला शेती करत होत्या; पण आर्थिक निर्णय घेण्याचा अधिकार त्यांच्याकडे नव्हता. कर्जासाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहावे लागायचे. सरकारी कार्यालयांत त्यांच्या श्रमापेक्षा सातबाऱ्यावरील नावाला अधिक महत्त्व दिले जात होते. हा अन्याय आता इतिहासजमा होण्याची चिन्हे आहेत. स्त्रीच्या कष्टाला कागदोपत्री मान्यता मिळणे म्हणजे तिच्या स्वाभिमानाला मिळालेली खरी सलामी होय. विशेष म्हणजे या विधेयकात ग्रामसभा आणि नगरपंचायतींना प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. अर्ज मंजूर झाल्यानंतर १५ दिवसांत प्रमाणपत्र देणे बंधनकारक करण्यात आले आहे. इतकेच नव्हे, तर अर्ज न केलेल्या पात्र महिलांनाही शोधून त्यांना लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. ही बाब प्रशासनाच्या संवेदनशीलतेचे द्योतक आहे. महिला शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र मदत केंद्र, तक्रार निवारण यंत्रणा आणि मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय महिला शतकरी सक्षमीकरण परिषद स्थापन करण्याचा निर्णयही महत्त्वपूर्ण आहे.

कायदा करून सांत्वन पुरेसे नसते; त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे तितकेच आवश्यक असते. त्यामुळे या यंत्रणांची जबाबदारी अधिक महत्त्वाची ठरणार आहे. तथापि, केवळ कायदा झाला म्हणजे सर्व प्रश्न सुटतील, असा समज करून चालणार नाही. समाजाची मानसिकता बदलणेही तितकेच गरजेचे आहे. अजूनही अनेक ठिकाणी स्त्रीचा श्रम 'कर्तव्य' म्हणून पाहिला जातो, 'काम' म्हणून नाही. तिच्या योगदानाची आर्थिक आणि सामाजिक किंमत ओळखली गेली पाहिजे. घरातील निर्णयांपासून शेतीच्या नियोजनापर्यंत महिलांचा सहभाग वाढविणे ही काळाची गरज आहे. भारतीय संस्कृतीत स्त्रीला अन्नपूर्णा, लक्ष्मी, भूमाता आणि शक्तीचे रूप मानले जाते. मग प्रत्यक्ष भूमीत राबणाऱ्या त्या स्त्रीला 'शेतकरी' म्हणून मान्यता देण्यास एवढा विलंब का झाला, हा प्रश्नही आपण स्वतःला विचारला पाहिजे. आजचा हा कायदा त्या ऐतिहासिक अन्यायाची अंशतः भरपाई करणारा आहे. महाराष्ट्राने या निर्णयातून देशासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. आता इतर राज्यांनीही या दिशेने पाऊल उचलण्याची नाळ जोडून आयुष्य वेचणाऱ्या स्त्रीच्या हातात आहे. आज शेतातील प्रत्येक मातीचा कण जणू म्हणत आहे. "जिच्या घामाने माझी ऊब वाढली, जिच्या कष्टांनी माझ्या कुशीत पीक बहरेल, त्या हातांना अखेर न्याय मिळाला." हा न्याय केवळ महिलांचा नाही; तो भारतीय शेतीच्या आत्मसन्मानाचा विजय आहे.

# धरती आबा योजनेतील कामांना गती देऊन उर्वरित कामेही कालबद्ध पद्धतीने पूर्ण करा

## खासदार स्मितताई वाघ यांनी घेतला मतदारसंघातील ३० गावांतील कामांचा आढावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगावातील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात शनिवार, दि. ४ जुलै रोजी खासदार स्मितताई वाघ यांनी जळगाव लोकसभा मतदारसंघातील धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत समाविष्ट ३० गावांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

या योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्यांतर्गत विविध विकासकामे, नव्याने समाविष्ट करता येणारी कामे तसेच जनजाती गावांपर्यंत शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी लाभ पोहोचविण्याबाबत संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या. यामध्ये प्रत्येक गावातील सुरू असलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावून सर्व कामे कालबद्ध कार्यक्रमानुसार पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचनाही खासदार वाघ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ जनजाती बांधवांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असेही सांगितले .

यावेळी खासदार वाघ यांनी जळगाव लोकसभा मतदारसंघातील धरती आबा योजनेत अद्याप समाविष्ट न झालेल्या ३७ जनजाती गावांचा मुद्दाही उपस्थित केला. काही तांत्रिक कारणांमुळे या गावांचा योजनेत समावेश होऊ शकलेला नसल्याचे नमूद करत या गावांचाही लवकरात लवकर योजनेत समावेश व्हावा, यासाठी त्यांनी यापूर्वी लोकसभेत प्रश्न उपस्थित केला असल्याची माहिती दिली. तसेच या प्रस्तावाचा शासन स्तरावर सुरू असलेल्या पाठपुराव्याचाही आढावा बैठकीत घेण्यात आला.

जनजाती गावांचा सर्वांगीण विकास, पायाभूत सुविधा, मूलभूत सेवा आणि शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक पात्र कुटुंबापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक परिणामकारक व गतिमान पद्धतीने काम करावे, असे निर्देश खासदार वाघ यांनी यावेळी दिले. बैठकीस जिल्हाधिकारी



*अमळनेर : जळगावातील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात शनिवार, दि. ४ जुलै रोजी जळगाव लोकसभा मतदारसंघातील धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत समाविष्ट ३० गावांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेताना खासदार स्मितताई वाघ. शेजारी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. करिष्मा नायर, आदिवासी एकात्मिक प्रकल्प यावलचे प्रकल्प अधिकारी अरुण पवार, विविध विभागांचे सर्व प्रमुख अधिकारी, जळगाव लोकसभा मतदारसंघातील सर्व गटविकास अधिकारी आदी.*

रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. करिश्मा नायर, आदिवासी एकात्मिक प्रकल्प यावलचे प्रकल्प अधिकारी अरुण पवार, विविध विभागांचे सर्व प्रमुख अधिकारी, जळगाव लोकसभा मतदारसंघातील सर्व गटविकास अधिकारी तसेच धरती आबा योजनेंतर्गत समाविष्ट ३० गावांचे ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.



*अमळनेर : तालुक्यातील शिरूड येथील श्री दत्त सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष शशिकांत पाटील यांची विभागीय ग्रंथालय संघटनेच्या सदस्यपदी निवड झाल्याने त्यांचा सन्मान करताना विविध मान्यवर.*

# ग्रंथालय क्षेत्रातील योगदानाची मिळाली पावती

## शशिकांत पाटील यांची विभागीय ग्रंथालय संघटनेवर निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील शिरूड श्री दत्त सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष शशिकांत रघुनाथ पाटील यांची विभागीय ग्रंथालय संघटनेच्या सदस्यपदी निवड झाल्याने शिरूड गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय निवडीबद्दल शिरूड येथे सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध मान्यवर पदाधिकारी तसेच गावातील सुजाण नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जळगाव, धुळे, नंदुरबार, नगर आणि नाशिक या पाच जिल्ह्यांमधून ज्येष्ठत्वाच्या निकषावर झालेली त्यांची निवड ही त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाची, अभ्यासू वृत्तीची आणि ग्रंथालय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची पावती मानली जात आहे. यापूर्वीही त्यांनी जळगाव जिल्हा ग्रंथालय संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून उल्लेखनीय कार्य केले असून त्यांच्या कार्याचा ठसा ग्रंथालय क्षेत्रावर उमटला आहे. त्यांच्या या निवडीमुळे शिरूड येथील वाचनालयाच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

वाचकांसाठी अधिक चांगल्या सुविधा, विविध ज्ञानवर्धक उपक्रम आणि अभ्यासपूर्ण वातावरण निर्माण होण्यास या नेतृत्वाचा निश्चितच फायदा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. दादासाहेब पाटील यांच्या ज्ञानसेवा आणि समाजसेवेचा प्रवास असाच यशस्वीपणे सुरू राहो तसेच भविष्यातही त्यांना अनेक मानाच्या पदांवर कार्य करण्याची संधी लाभो, अशा शुभेच्छा यावेळी उपस्थितांकडून देण्यात आल्या.

# 'बीएलओं'च्या दारी अधिकारी

पान १ वरून

च्या मतदार यादीची पडताळणी करण्यासाठी 'एसआयआर' मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी 'बीएलओं'वर मोठा ताण निर्माण झाला होता. त्यामुळे शिक्षक 'बीएलओं'ना मदत करण्यासाठी सहाय्यक 'बीएलओं'ची नियुक्ती करण्यात आली. मात्र, मोठ्या संख्येने शिक्षक या कामात गुंतल्याने शैक्षणिक कामकाजावर परिणाम होऊ लागला. वरिष्ठ स्तरावरून सातत्याने कामाचे मूल्यमापन होत असल्याने प्रगतीचा वेग वाढविण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांनी घरोघरी जाऊन 'बीएलओं'च्या कामाची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांनीही कामाला गती देण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी अमळनेर शहरातील 'बीएलओं'च्या कामाची टक्केवारी तपासून संथगतीने काम करणाऱ्या 'बीएलओं'ची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. त्यांना येणाऱ्या अडचणी जाणून घेत कामाचा वेग वाढविण्याच्या सूचना दिल्या. तसेच कामात कुचराई झाल्यास कायदेशीर अडचणी निर्माण होऊ शकतात, याचीही जाणीव करून दिली.

**प्रशिक्षण कार्यक्रमही पुढे ढकलले**

अनेक शाळांमध्ये 'बीएलओ' म्हणून कार्यरत शिक्षकांची संख्या जास्त असल्याने शाळेतील तासिका आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होऊ लागला होता. त्यातच इयत्ता दुसरी,



*अमळनेर : मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम निर्धारित कालावधीत पूर्णत्वास यावा, या उद्देशातून 'बीएलओं'च्या अडचणी थेट त्यांच्या घरी जाऊन समजून घेताना मुख्याधिकारी गणेश शिंदे.*

तिसरी, चौथी आणि सहावीचा अभ्यासक्रम बदलल्याने काही शिक्षक प्रशिक्षणासाठी, तर काही 'बीएलओं'च्या कामात व्यस्त असल्याने अनेक शाळा शिक्षकांविना ओस पडत होत्या. त्यामुळे मुख्याध्यापक आणि प्रशासन यांच्यात समन्वयाचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. करिष्मा नायर यांनी स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी प्राथमिक शाळांच्या वेळेत बदल करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार शाळा सकाळी आठ ते दुपारी दोन या वेळेत भरविण्यात येणार आहेत. तसेच इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या मराठी व उर्दू माध्यमाच्या तालुका व जिल्हास्तरीय शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले असून, त्याच्या नव्या तारखा नंतर जाहीर करण्यात येणार आहेत.

# 'ब्रह्मपूर–उधना' अमृत भारत एक्स्प्रेस आता दररोज

## आज उद्घाटन विशेष फेरी; खानदेशातील प्रवाशांना मोठा दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्रातील खानदेश, विदर्भ तसेच गुजरात, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमधील प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. रेल्वे बोर्डाने ब्रह्मपूर–उधना–ब्रह्मपूर अमृत भारत एक्स्प्रेस (क्रमांक १९०२१/१९०२२) गाडी त्रि–साप्ताहिक सेवेतून आता दररोज चालविण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना आठवड्यातील मर्यादित फेऱ्यांऐवजी वर्षभर नियमित प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

पूर्व किनारी रेल्वे (ईस्ट कोस्ट रेल्वे) प्रशासनाच्या आदेशानुसार या गाडीची ०८४११ ब्रह्मपूर–उधना उद्घाटन विशेष फेरी सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी दुपारी ५.०० वाजता ब्रह्मपूर स्थानकावरून रवाना होणार आहे. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार ही वेळ तात्पुरती असून, अंतिम वेळापत्रकात आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो.

**सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश**

ब्रह्मपूर–उधना गाडीला दैनंदिन स्वरूप मिळावे, यासाठी पश्चिम रेल्वे, मुंबई



सेंट्रलचे डीआरयूसीसी सदस्य तथा धरणगाव तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र शिवराज कोठारी यांनी सातत्याने रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. वाढती प्रवासी संख्या, आरक्षणासाठी होणारी गर्दी आणि खांदेशातील नागरिकांची मागणी याबाबत त्यांनी रेल्वे बोर्डासह संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते. त्यानंतर रेल्वे बोर्डाने दैनंदिन सेवा सुरू करण्यास मंजुरी दिली.

**खान्देशसह चार राज्यांतील प्रवाशांना फायदा**

ब्रह्मपूर–उधना गाडीला दैनंदिन गाडी सोडण्याच्या निर्णयामुळे धरणगाव, अमळनेर, जळगाव, भुसावळ, नंदुरबार तसेच संपूर्ण तापी पट्ट्यातील प्रवाशांना मोठा लाभ होणार आहे. व्यावसायिक, विद्यार्थी, नोकरीसाठी प्रवास करणारे नागरिक, धार्मिक यात्रेकरू तसेच ओडिशा व आंध्र प्रदेशमध्ये जाणाऱ्या प्रवाशांसाठी ही सेवा अधिक सोयीची ठरणार आहे. गुजरातमधील उधना मार्गे सुरत व इतर औद्योगिक शहरांशीही प्रवास अधिक सुलभ होणार आहे.

**आरक्षणाचा ताण कमी होणार**

दररोज सेवा सुरू झाल्यानंतर आरक्षणाचा ताण कमी होण्यास मदत होईल. प्रवाशांना प्रवासासाठी अनेक दिवस वाट पाहावी लागणार नाही. उद्योग, व्यापार, शिक्षण आणि वैद्यकीय कारणांसाठी नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांनाही या निर्णयाचा मोठा फायदा होणार असल्याचे रेल्वे प्रवासी संघटनांनी म्हटले आहे. या निर्णयाबद्दल रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, खासदार स्मिता उदय वाघ, रेल्वे बोर्ड, पश्चिम रेल्वे तसेच ईस्ट कोस्ट रेल्वे प्रशासनाचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत. लवकरच उधना–ब्रह्मपूर अमृत भारत एक्स्प्रेसचे (क्रमांक १९०२१/१९०२२)नियमित दैनंदिन वेळापत्रक जाहीर होणार आहे.

# चाणक्यांचे 'हे' ४ विचार बदलतील आयुष्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आचार्य चाणक्य हे अत्यंत बुद्धिमान आणि दूरदृष्टी असलेले पुरुष होते. त्यांच्या नीती आजही आपल्याला जीवनाकडे पाहण्याचा एक नवीन आणि सकारात्मक दृष्टिकोन देतात.

**संगतीचे महत्त्व ओळखा**

तुमचे आयुष्य तुमच्या सभोवतालच्या लोकांवर अवलंबून असते. मेहनती आणि सकारात्मक लोकांच्या संगतीत राहिल्याने प्रगती होते, तर चुकीची संगत प्रगती रोखते.

**वेळेचा सदुपयोग करा**

गेलेली वेळ कधीही परत येत नाही. जो व्यक्ती वेळेला महत्त्व देतो, तो यशाच्या अर्ध्या वाटेवर पोहोचलेला असतो. आपली सर्व कामे योग्य वेळी करणे यशासाठी अनिवार्य आहे.

**ज्ञान हीच खरी शक्ती**

पैसा आणि पद कायम टिकत नाही, पण ज्ञान आयुष्यभर सोबत राहते. कठीण काळात योग्य निर्णय घेण्याची क्षमता केवळ ज्ञानामुळेच मिळते, म्हणून नेहमी काहीतरी नवीन शिकत राहा.

**आंधळेपणाने विश्वास ठेवू नका**

प्रत्येक व्यक्ती जशी दिसते तशी नसते. कोणावरही विश्वास ठेवण्यापूर्वी त्यांचे वर्तन आणि हेतू समजून घेणे आवश्यक आहे. जीवनात नेहमी सावधगिरी आणि संतुलन राखा.

**नोकरी आणि व्यवसायात लाभ**

चाणक्यांच्या या धोरणांमुळे नोकरीत मान–सन्मान वाढतो आणि व्यवसायात योग्य निर्णय घेतल्यामुळे आर्थिक प्रगतीचे मार्ग मोकळे होतात.

**बदल स्वतःपासून करा**

जेव्हा तुम्ही या गोष्टी सखोलपणे समजून घेता, तेव्हा तुम्ही तुमचे जीवन अधिक चांगल्या प्रकारे जगायला शिकता. आजपासूनच या नीतींचा अवलंब करा आणि यशाकडे पाऊल टाका.

# वेश्या व्यवसायासाठी प्रवृत्त करतेवेळी पत्नीच्या तोंडात कोंबली दारू, भांग

## तांबेपुरातील तरुणाचा प्रताप; गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पत्नीने वेश्या व्यवसाय करावा, यासाठी तिला दारू पाजून, भांग खाऊ घालून मारहाण केल्याची घटना बुधवार, दि. १ जुलै रोजी येथील तांबेपुरा भागात घडली. याबाबत पती, जेठाणी आणि अनोळखी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी, की फिजा फिरोज पिंजारी (रा. तांबेपुरा–नंदगाव रस्ता) हीस बुधवार, दि. १ जुलै रोजी दुपारी दोन वाजता प्रकृती ठीक नसताना पती फिरोज रहेमतूल्ला पिंजारी याने बाहेरून घरी येऊन देशी दारूची बाटली पुढे करून सांगितले, की तुझी प्रकृती ठीक नाही. त्यामुळे या बाटलीत 'ओआरएस'ची पावडर टाकली आहे. तू पिऊन घे. यावेळी त्याने ग्लासमध्ये बाटलीतील पाणी टाकले आणि फिजाला पाजले. तेव्हा तिला कळाले की त्यात दारू आहे. तिने ते पिण्यास नकार दिला. ग्लासमधील उर्वरित दारू फिरोजने घेतली. फिजा घरातील कामाला लागल्यावर सायंकाळी फिरोजने पुन्हा तिला विचारले, की तुला ते पाणी प्याल्याचा त्रास होत आहे का? यावर फिजाने नाही म्हटले असता फिरोजने भांगची गोळी आणून तिच्या तोंडात कोंबली. तिला नशा चढू लागताच त्याने त्याच्या मित्राला घराच्या मागील दाराने बोलावून घेतले आणि पत्नीला तुला वेश्या व्यवसायासाठी बसवेन. त्यावेळी फिजा हात झटकून पळू लागली असता फिरोजने तिचे केस ओढून तू जर वेश्या व्यवसाय केला नाही तर जीवंत मारून टाकेल, अशी धमकी दिली. तिने फिर्याद दिल्यावरून पती फिरोज, जेठाणी आणि त्याचा मित्र यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हवालदार चंद्रकांत पाटील तपास करीत आहेत. दरम्यान, पोलिसांनी फिजाचे रक्तनमुने तपासणीसाठी पाठविले आहेत.

# आमिर खान पुन्हा एकदा चढला बोहल्यावर

## 'या' विदेशी तरुणीसोबत गुपचूप उरकले रजिस्टर मॅरेज; फोटो आला समोर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूड अभिनेता आमिर खान आणि त्यांची मैत्रीण गौरी स्प्रॅट यांच्या लग्नाची चर्चा सोशल मीडियावर जोर धरू लागली आहे. काही माध्यमांमध्ये आणि सोशल मीडिया पोस्टमध्ये दोघांनी मुंबईतील आमिर खान यांच्या निवासस्थानी साध्या पद्धतीने विवाह केल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच त्यांच्या कथित लग्नाचा पहिला फोटोही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असल्याचे सांगितले जात आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार रविवार, दि. ५ जुलै रोजी कुटुंबीय आणि अत्यंत जवळच्या नातेवाईकांच्या उपस्थितीत हा खासगी विवाहसोहळा पार पडल्याचा दावा केला जात आहे. व्हायरल होत असलेल्या छायाचित्रात आमिर खान आणि गौरी स्प्रॅट विवाह नोंदणीसंदर्भातील कागदपत्रांवर स्वाक्षरी करताना दिसत असल्याचे म्हटले जात आहे. याप्रसंगी दोन्ही कुटुंबांतील सदस्य उपस्थित असल्याचाही दावा करण्यात आला आहे. व्हायरल झालेल्या छायाचित्रात आमिर खान पांढऱ्या रंगाच्या कुर्ता–पायजम्यात आणि चष्म्यात दिसत असल्याचे सांगितले जात आहे, तर गौरी स्प्रॅट ऑफ–व्हाईट आणि गोल्डन रंगाच्या पारंपरिक पोशाखात दिसत असल्याचा दावा केला जात आहे. दोघांच्या साधेपणाच्या लूकची सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू असून चाहते त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत असल्याच्या पोस्टही समोर येत आहेत.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# ‘पास होने लायक नंबर तो लाओ’ दिल को लग गई पिता की बात

## पहले निकाला आयआयटी, फिर यूपीएससी, आज हैं आयपीएस

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कभी-कभी कोई बात या अक्सर कहे गए शब्द जिंदगी की दिशा बदल देते हैं। कुछ ऐसा ही मोहिबुल्लाह अंसारी के साथ हुआ। जब वह १०वीं-१२ वीं की प्री-बोर्ड परीक्षाओं में फेल हो गए थे तो उनके पिता ने कहा कि कम से कम पास होने लायक तो नंबर लेकर आओ। यही बात उनके दिल को लग गई और जीवन की टर्निंग प्वाइंट बन गई। यहीं से उन्होंने अनुशासन, फोकस और कड़ी मेहनत का रास्ता चुना। पहले आयआयटी निकाला और फिर देश की सबसे मुश्किल परीक्षाओं में शामिल यूपीएससी क्रैक किया। आज वह एक आयपीएस अधिकारी हैं। आइए इस सक्सेस स्टोरी में जानते हैं उनका संघर्ष से सफलता तक का सफर, जो हर हाल में खुद पर भरोसा करते हुए आगे बढ़ने की प्रेरणा देता है।

### बिहार के सिवान से शुरू हुआ था सफर, ‘मुसीबतउल्लाह’ कहकर बुलाते थे दोस्त

मोहिबुल्लाह अंसारी बिहार के सिवान जिले के रहने वाले हैं। वह एक वीडियो में बताते हैं कि पहले पढ़ाई-लिखाई पर ध्यान नहीं देते थे। इसलिए उन्हें बहुत शरारती कहा जाता था और उनके क्लासमेंट मजाक में उन्हें ‘मुसीबतउल्लाह’ कहकर बुलाते थे क्योंकि वह अक्सर किसी न किसी मुसीबत में फंस जाते थे। पढ़ाई पर ध्यान देने की वजह से उनके घर वाले भी अक्सर उन्हें डांटते थे।

### प्री-बोर्ड में फेल होने पर बोले पिता- ‘पास होने लायक तो नंबर लेकर आओ’

वह बताते हैं कि शुरुआत में पढ़ाई पर ध्यान देने का असर उनकी एकेडमिक परफार्मेंस पर भी पड़ा। वह १०वीं-१२वीं की प्री बोर्ड परीक्षाओं में फेल हो गए थे। इसके बाद उन्हें परिवार की आलोचना का सामना करना पड़ा। उनके पिता ने ताना मारते हुए कहा कि आयआयटी जाने का सपना देख रहे हो लेकिन पहले पास होने लायक नंबर तो लेकर आओ। तब उन्हें अहसास हुआ कि वह इंजीनियरिंग का सपना देख रहे हैं को उनके घर वाले चिंतित हैं कि मैं स्कूल की परीक्षाएं नहीं पास कर पा रहा हूं।

### दिल को लग गई पिता की बात तो शुरू की आयआयटी-जेईई की तैयारी



अंसारी ने आगे बताया कि पिता की बात का उनके दिल पर गहरा असर हुआ और वे उनके लिए प्रेरणा का स्रोत बन गए। यहीं से उन्होंने अपनी १२वीं की पढ़ाई पर गंभीरता से ध्यान दिया और आयआयटी जाने के लिए जेईई की तैयारी शुरू कर दी थी। यह उनकी पढ़ाई के सफर में एक बड़े बदलाव की शुरुआत थी।

### पहले आयआयटी दिल्ली से किया बीटेक, २०१५ में छोड़ दी नौकरी

कई साल की कड़ी मेहनत के बाद उन्होंने जेईई मेन और जेईई एडवांस्ड क्लियर किया। २०११ में उन्होंने केमिकल इंजीनियरिंग में बी. टेक. करने के लिए इंडियन इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी (आयआयटी) दिल्ली में एडमिशन लिया था। कोर्स कंप्लीट होने के बाद नौकरी करने लेग। हालांकि, नौकरी शुरू करने के १०-१२ दिन बाद ही उन्हें अहसास हुआ कि कॉर्पोरेट की राह उनके लिए नहीं है और समाज पर बड़ा असर डालने के लक्ष्य को लेकर नौकरी छोड़ने का फैसला कर लिया।

### यूपीएससी में ३ बार हारने के बाद मिली सफलता, बने आयपीएस अफसर

मवह बताते हैं कि २०१५ में दिल्ली चले गए और यूपीएससी सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू कर दी। रोजाना १० से १२ घंटे पढ़ाई करके उन्होंने अपने पहले ही प्रयास में प्रीलिम्स और मेन्स परीक्षाएं पास कर लीं लेकिन इंटरव्यू नहीं हो पाया। अगले साल फिर कोशिश की और एक बार फिर इंटरव्यू के चरण तक पहुंचे। यूपीएससी के ३ प्रयास में हारने के बाद उन्होंने अपना सपना नहीं छोड़ा। २०२१ में उन्होंने एक बार फिर यूपीएससी सिविल सेवा परीक्षा दी और प्रीलिम्स और मेन्स पास करने के बाद इंटरव्यू भी क्रैक किया। यूपीएससी में ऑल इंडिया रैंक (एआयआर) ३८१ लाकर आयपीएस बन गए। वर्तमान में वह वर्तमान में बिहार के मुजफ्फरपुर में सिटी एसपी के रूप में तैनात हैं।

# पावसाळ्यात उठसूठ आल्याचा चहा घेताय... सावधान!

## आरोग्य येईल धोक्यात; मर्यादित सेवन आवश्यक



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तज्ज्ञांच्या मते दिवसातून ४ ग्रॅमपेक्षा जास्त आल्याचे सेवन करू नये; जास्त प्रमाणात आल्याचा चहा किंवा काढा पिणे शरीरासाठी नुकसानकारक ठरू शकते.

**ॲसिडिटी आणि जळजळ**

आल्याच्या चहाचे अतिसेवन केल्यास अनेकांना छातीत जळजळ, ॲसिडिटी किंवा पोटात तीव्र अस्वस्थता जाणवू शकते.

**ॲलर्जीची लक्षणे**

हा चहा प्यायल्यानंतर अंगावर खाज सुटणे, पुरळ उठणे किंवा तोंडात पुरळ येणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**पित्ताशयाच्या समस्या**

ज्या लोकांना आधीपासूनच पित्ताशयाशी (गॉलब्लॅडर) संबंधित काही आजार आहेत. त्यांनी आल्याचा चहा पिणे टाळावे किंवा डॉक्टरांना विचारावे.

**कमी रक्तदाब**

आले हे रक्तदाब कमी करण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे ज्यांचा बीपी आधीच कमी असतो किंवा जे औषधे घेतात त्यांनी सावध राहावे.

**रक्त पातळ होण्याचा धोका**

आल्यामध्ये रक्त पातळ करण्याचे नैसर्गिक गुणधर्म असतात. त्यामुळे ब्लीडिंग डिसऑर्डर असलेल्यांनी किंवा रक्त पातळ होण्याचे औषध घेणाऱ्यांनी हा चहा टाळावा.

**आरोग्यासाठी फायदे**

योग्य प्रमाणात आल्याचा चहा प्याल्यास मळमळ, उलट्या, अपचन आणि पोट खराब होणे यांसारख्या समस्यांमध्ये आराम मिळतो.

# पावसाळ्यात कपडे, अंतर्वस्त्र सुकण्यासाठी काय कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पावसाळ्यात कपडे आणि अंतर्वस्त्रे लवकर सुकण्यासाठी वॉशिंग मशीनमध्ये ‘एक्स्ट्रा स्पिन’ (जास्तीचा स्पिन सायकल) चालवून पाण्याचे प्रमाण कमी करा घरात पंख्याखाली किंवा एअर कंडिशनर सुरू करून कपडे योग्य अंतरावर टांगा. तसेच किंचित ओलसर कपड्यांवर गरम इस्त्री फिरवून ते लगेच कोरडे व निर्जंतुक करता येतात

पावसाळ्यात दमट वातावरणामुळे कपडे न सुकणे ही एक मोठी समस्या असते परंतु काही सोप्या आणि प्रभावी उपायांनी तुम्ही ही समस्या सहज सोडवू शकता.

**जास्तीचे पाणी काढून टाका :** कपडे वाळत घालण्यापूर्वी त्यातील जास्तीत जास्त पाणी निथळून जाणे गरजेचे आहे. वॉशिंग मशीनमध्ये अतिरिक्त स्पिन सायकल चालवा किंवा कपडे हाताने पिळून जास्तीचे पाणी काढून टाका.

**योग्य अंतर ठेवा :** कपडे वाळत घालताना एकमेकांना चिकटणार नाहीत याची काळजी घ्या. कपड्यांमध्ये योग्य अंतर ठेवल्यास हवा खेळती राहून ते लवकर सुकतात.

**पंखा आणि खिडकीचा वापर :** घरात कपडे वाळत घालताना छतावरील किंवा टेबल फॅन थेट कपड्यांच्या दिशेने सुरू ठेवा हवा खेळती राहणे कपडे सुकण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे

## जाणून घ्या सोपे आणि प्रभावी उपाय



**इस्त्रीचा वापर :** अंतर्वस्त्रे किंवा हलके कपडे पूर्णपणे सुकले नसतील, तर त्यांना इस्त्री (प्रेस) करा यामुळे कपड्यांमधील उरलेला ओलावा लगेच निघून जातो आणि कुबट वास देखील येत नाही.

**डीह्युमिडिफायर किंवा एसीचा वापर :** खोलीतील ओलावा (आर्द्रता) कमी करण्यासाठी तुम्ही एअर कंडिशनर किंवा डीह्युमिडिफायर वापरू शकता. यामुळे कपडे लवकर वाळतात.

# तणाव अन् चिडचिड झटक्यात होईल गायब!

## ‘हे’ सोपे घरगुती तोडगे नक्की करा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवसाची सुरूवात सकाळी उठल्यानंतर काही मिनिटे ध्यान, प्रार्थना किंवा चांगल्या विचारांवर लक्ष केंद्रित केल्यास मन स्थिर राहते आणि तणाव कमी होतो.

**रोज ३० मिनिटे व्यायामाला प्राधान्य**

दररोज किमान ३० मिनिटे चालणे किंवा योगासने केल्याने शरीरात ‘एंडॉर्फिन’ हे आनंदी हार्मोन्स वाढतात, जे चिंता व नैराश्य दूर करतात.

**७ ते ८ तासांची पुरेशी झोप**

अपुऱ्या झोपेमुळे मानसिक थकवा आणि चिडचिड वाढते; म्हणूनच दररोज ७ ते ८ तासांची शांत व गुणवत्तापूर्ण झोप घेणे अनिवार्य आहे. मोबाईल आणि सततच्या स्क्रीन वापरामुळे मानसिक ताण वेगाने वाढतो, म्हणूनच दिवसातून काही वेळ इंटरनेट आणि फोनपासून दूर राहावे.

**आवडत्या छंदांना वेळ द्या**

दैनंदिन धावपळीतून विरंगुळा मिळविण्यासाठी रोजच्या दिनचर्येत वाचन, उत्तम संगीत, चित्रकला किंवा बागकामासारख्या छंदांना आवर्जून स्थान द्या.

**मित्र व कुटुंबीयांशी संवाद**

आपल्या मनातील विचार जवळच्या व्यक्तींशी शेअर केल्याने मन हलके होते आणि सामाजिक संबंध मजबूत असल्यास तणावाचा सामना करणे सोपे जाते.

**आहाराच्या सहाय्याने मानसिक संतुलन**

आहारात ताजी फळे, भाज्या आणि प्रथिनांचा समावेश केल्यास शरीर व मन दोन्ही निरोगी राहते आणि अति प्रमाणात कॅफिन घेणे टाळावे.

# किचनमध्ये ‘अनवाणी’ पायाने काम करताय...

## भविष्यात उद्भवतील या व्याधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्वयंपाकघराची फरशी कडक असल्याने तेथे जास्त वेळ अनवाणी उभे राहिल्याने टाचा, गुडघे आणि पाठीच्या खालच्या भागावर अतिरिक्त ताण पडतो. कोणत्याही सपोर्ट किंवा गादीशिवाय उभे राहिल्यामुळे पायाच्या तळव्यांचे आणि टाचांचे स्नायू लवकर थकतात. यामुळेच अनेक महिलांना सायंकाळपर्यंत टाचांमध्ये तीव्र वेदना, पायात पेटके येणे आणि पाय जड पडल्यासारखे वाटू लागते.

एकाच ठिकाणी जास्त वेळ उभे राहिल्याने रक्ताभिसरण मंदावते. ज्यामुळे पाय सुजणे आणि जडपणा येण्याची समस्या उद्भवते. बऱ्याचदा लोक या वेदनांना वाढत्या वयाचे कारण समजतात. परंतु हा त्रास वर्षानुवर्षे केलेल्या एकाच चुकीच्या सवयीमुळे असू शकतो. स्वयंपाकघरात मऊ, सपोर्टिव्ह आणि अँटी-स्लिप (न घसरणाऱ्या) चपलांचा वापर केल्यास शरीराच्या वजनाचा भार थेट हाडांवर पडत नाही.







शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाॅउस पारोला रोड, धुळे




# आज सोमवार! काय आहे पारद शिवलिंग? काय आहे विशेष महत्त्व?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात देवांचे देव महादेव यांना विशेष महत्त्व असून त्यांना देवांचे देव मानले जाते. ज्या व्यक्तीवर महादेवांची कृपा होते त्या व्यक्तीला जीवनात कशाचीच कमी भसत नाही. त्यामुळे महादेवांना प्रसन्न करण्यासाठी भक्त विधीवत पूजनाह विविध उपाय करतात. महादेवांची पूजा केल्याने प्रत्येक कार्यात यश मिळते. ज्योतिषशास्त्रामध्ये पारद शिवलिंगाचे विशेष महत्त्व सांगितले आहे. या शिवलिंगाला रसराज असेही म्हणतात. पारा धातू शुद्ध करून वैदिक पद्धतीने या शिवलिंगाचे निर्माण केले जाते. शास्त्रानुसार 'ब्रह्महत्य सहस्त्राणि गौहत्याः शतानि च, तत्क्षणाद्विलयं यान्ति रसलिंगस्य दर्शनात्, स्पर्शनात्प्राप्यत मुक्तिरिती सत्यं शिवोदितम्'. म्हणजेच कोट्यवधी शिवलिंगाच्या दर्शनाचे फळ एकट्या पारद शिवलिंगाच्या पूजेने आणि दर्शनाने मिळते. पारद शिवलिंगाची पूजा केल्याने सकारात्मक फळ



लाभते. धार्मिक मान्यतेनुसार पारद शिवलिंग हे भगवान शंकर यांचे वास्तविक रूप आहे, म्हणून या शिवलिंगाची विधीवत पूजा केल्याने अनेक प्रकारे फायदा होतो. घरातील पारद शिवलिंग सौभाग्य, शांती, आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी अत्यंत शुभ आहे. दुकाने, कार्यालये आणि कारखान्यांमध्ये व्यवसाय वाढवण्यासाठी पारद शिवलिंगाची पूजा हा एक निश्चित मार्ग आहे.

पारद शिवलिंग हे महादेवांचे प्रत्यक्ष रूप मानले जाते. त्यामुळे घरात पारद शिवलिंगाची प्रतिष्ठापना करा. घरातील देव्हाऱ्यात पार्वती-शिवांचे चित्र असेल तर त्यांच्यासमोर पारद शिवलिंगाची स्थापना करा. तत्पूर्वी चांदीच्या, तांब्याच्या किंवा पितळाच्या ताटावर पांढरे कापड पसरून त्यांना शिवलिंग बसवावे. सर्व प्रथम पारद शिवलिंगाच्या उजव्या बाजूला दिवा लावावा. त्यापूर्वी त्यांना गंगाजलाने आभिषेक करा. यावेळी 'ओम नमः शिवाय, ओम् त्र्यंबकम् यजामहे सुगंधिम् पुष्टिवर्धनम्। उर्वारुकमिव बंधनात् मृत्योर्मुक्षीय मामृतात्' इत्यादी मंत्रांचा उच्चार करा. शिवलिंगाची प्रतिष्ठापना करण्यासाठी लक्षात घ्या, की पूजा करताना तुमचे तोंड पूर्व-उत्तर दिशेला असावे. दररोज सकाळी नियमित पूजा करावी, असे केल्याने सकारात्मक लाभ होतो. तर श्रावण किंवा शिवरात्रीच्या सोमवारी विशेष पूजा करा.

### पारद शिवलिंग पूजनाने होतो लाभ

धार्मिक मान्यतेनुसार महादेव हे पारद शिवलिंगात वास करतात. ज्या घरात पारदचे शिवलिंग असते त्या घरात तंत्र-मंत्रचा किंवा इतर कोणत्याही नकारात्मक शक्तीचा प्रभाव राहत नाही. यासह विद्यार्थ्यांनी मानसिक क्षमता वाढविण्यास मदत होते. 'ओम नमः शिवाय'चा जप केल्याने ज्ञान, बुद्धी आणि बुद्धी वाढते. तर महामृत्युंजय मंत्राने आरोग्य आणि दीर्घायुष्यासाठी लाभते. घरात पारद शिवलिंगाची नियमित पूजा केल्याने घरात समृद्धी येते. विवाहास पात्र असलेल्या तरुण-तरुणींनी पारद शिवलिंगासमोर बसून मंत्रोच्चारांसह पूजा करावी आणि चांगला जोडीदार मिळावा यासाठी प्रार्थना करावी. यामुळे इच्छा लवकर पूर्ण होते. व्यवसायाच्या ठिकाणी पारद शिवलिंगाची स्थापना केल्याने व्यवसायात सतत प्रगती होते. पारद शिवलिंगावर रुद्राभिषेक केल्याने अनंत पुण्य प्राप्त लाभते. यासह घरात पारद शिवलिंगाची स्थापना करून महामृत्युंजय मंत्राचा जप आणि आरती केल्याने घरामध्ये धन, समृद्धी आणि लक्ष्मी मातेचे आरोग्य सदैव राहते.



# शिवलिंगाची उत्पत्ती कधी आणि कशी झाली?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शिवलिंग हे महादेवाचे रूप मानले जाते. असे म्हणतात, की या जगात शिवलिंगाचा पहिला जन्म झाला. शिवलिंग आत्मा आणि प्रकाशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठीदेखील ओळखले जाते. भागवत पुराणानुसार शिवलिंगाची उत्पत्ती कशी झाली ते जाणून घेऊया.

भगवान शिवजीला अनेक नावांनी संबोधले जाते. असे मानले जाते, की या जगात काहीही नव्हते तेव्हाही महादेव शिवलिंगाच्या रूपात उपस्थित होते. अशा परिस्थितीत आपल्या मनात एक प्रश्न येतो, की भगवान शंकर यांचे रूप असलेल्या शिवलिंगाची उत्पत्ती कशी झाली? शिवलिंगाच्या उत्पत्तीबद्दल अनेक पुराणांमध्ये वेगवेगळ्या कथा आढळतात. त्याचबरोबर शिवलिंगाच्या उत्पत्तीच्या अनेक कथा पौराणिक कथांमध्ये प्रचलित आहेत, परंतु जर आपण भागवत पुराणाबद्दल बोललो तर त्यात शिवलिंगाच्या उत्पत्तीशी संबंधित एक कथा आहे. काय आहे ती कथा जाणून घेऊया.

### शिवलिंगाच्या उत्पत्तीची कथा

भागवत पुराणानुसार जेव्हा विश्वाची निर्मिती झाली तेव्हा भगवान विष्णू आणि ब्रह्माजी यांच्यात दोघांमध्ये श्रेष्ठ कोण असा वाद सुरू झाला. स्वतःला सर्वांत शक्तिशाली सिद्ध करण्याच्या स्पर्धेत दोघांमध्ये वाद सुरू झाला. तेव्हा आकाशातून महादेवांचे प्रतिनिधित्व करणारे एक विशाल शिवलिंग प्रकट झाले. आकाशातून आवाज आला की जो कोणी या दैवी चमकदार दगडाचा शेवट शोधेल तो सर्वांत शक्तिशाली मानला जाईल. दगडाचा शेवट शोधण्यासाठी भगवान विष्णू आणि भगवान ब्रह्मा दोघेही पृथ्वीच्या कानाकोपऱ्यात गेले. पण त्यांना या दैवी दगडाचा शेवट सापडला नाही. पुष्कळ परिश्रमानंतर जेव्हा दोघेही शेवटपर्यंत पोहोचू शकले नाहीत, तेव्हा विष्णूजींनी हार स्वीकारली; परंतु ब्रह्माजींनी खोटेपणाचा अवलंब करून स्वतःला श्रेष्ठ सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. ब्रह्माजी म्हणाले, की त्यांना या दगडाचा शेवट सापडला होता. पण शेवटी सिद्ध झाले, की ब्रह्माजी खोटे बोलत होते. यानंतर महादेव प्रकट झाले आणि म्हणाले, की हे दैवी दगड शिवलिंग माझे रूप आहे. मी शिवलिंग आहे आणि मला अंत किंवा आरंभ नाही.

### शिवलिंगाचा अर्थ काय?

शिवलिंगाला दिव्य प्रकाश मानले जाते. मन, आत्मा, बुद्धी, आकाश, वायू, अग्नी, जल आणि पृथ्वी यातून शिवलिंगाची निर्मिती झाली, अशी पौराणिक मान्यता आहे. शिवलिंग हे संपूर्ण विश्वाचे प्रतीक मानले जाते. शिवलिंगाची उत्पत्ती जगात सर्वप्रथम झाली, असे म्हणतात. शिवलिंगाच्या पूजेला विशेष महत्त्व आहे. भक्तिभावाने पूजा केल्यास महादेव सर्व मनोकामना पूर्ण करतात.

# शिवलिंगासमोर भाविक ३ टाळ्या का वाजवतात?

## काय आहे यामागील महत्त्व, शास्त्र अन् फायदे? जाणून व्हाल थक्क...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या ज्या महिन्याची शिवभक्त आतुरतेने वाट पाहत आहेत तो म्हणजे श्रावण महिना लवकरच येत आहे. हिंदू धर्मात श्रावण महिना हा भगवान शिवजींना अत्यंत प्रिय मानला जातो. या महिन्यात भगवान शंकर यांची भक्तिभावाने पूजा, अभिषेक, जप आणि व्रत केल्याने विशेष पुण्य प्राप्त होते, अशी धार्मिक मान्यता आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवार (श्रावणी सोमवार) शिवभक्तांसाठी विशेष महत्त्वाचा असतो. या काळात तुम्ही अनेकदा पाहिले असेल, शिव मंदिरात शिवलिंगावर जल अर्पण करण्याव्यतिरिक्त भक्त ३ टाळ्याही वाजवतात. यामुळे असा प्रश्न निर्माण होतो, की असे करण्यामागे नेमके कारण काय? त्याचे धार्मिक महत्त्व आणि फायदे काय आहेत?

### शिवलिंगासमोर टाळ्या का वाजवल्या जातात?

श्रावण महिना हा भगवान भोलेनाथांना समर्पित असल्याने हा महिना भगवान शिवजींचा आशीर्वाद मिळविण्यासाठी भाविक शिव मंदिरांना भेट देतात, तसेच शिवलिंगावर जल अर्पण करतात आणि पूजा करतात. सोमवारी विशेषतः शिवजींची पूजा केली जाते. या काळात तुम्ही मंदिरात काही भक्तांना शिवलिंगासमोर टाळ्या वाजविताना पाहिले असेल. यामुळे असा प्रश्न निर्माण होतो, की असे का केले जाते आणि त्यामागे काय श्रद्धा आहे? शिवलिंगासमोर टाळ्या वाजविण्याचे महत्त्व,



फायदे आणि शास्त्रोक्त नियम सविस्तरपणे जाणून घेऊया.

### भगवान शिवाच्या पूजेमध्ये ध्वनीची एक विशेष भूमिका...!

धार्मिक मान्यतेनुसार भगवान शिवजी हे ध्यान, मौन आणि समाधीचे देव मानले जातात. याव्यतिरिक्त नटराजाच्या रूपात, ते सृष्टीच्या दैवी लय आणि ध्वनीचे अधिष्ठाता देवता आहेत. अशा संदर्भात भगवान शिवजींच्या पूजेमध्ये ध्वनी एक विशेष भूमिका बजावतो. धार्मिक श्रद्धेनुसार आरतीच्या वेळी घंटा, शंख आणि टाळ्यांचा एकत्रित नाद एक आध्यात्मिक वातावरण निर्माण करतो. शिवाय, हे भक्ताचे मन एकाग्र करण्यास उपयुक्त मानले जाते. शिवलिंगासमोर टाळ्या वाजविण्याचा उद्देश देवतेला जागृत करणे हा नसून, आपल्यामध्ये सुप्त असलेल्या भक्ती, जागरूकता आणि सकारात्मक चेतनेला जागृत करणे हा आहे.

### शास्त्रांमध्ये ३ टाळ्या वाजवण्याचे नियम काय आहेत?

ज्योतिषांच्या मते प्राचीन धर्मग्रंथांमध्ये शिवलिंगासमोर किती वेळा टाळ्या वाजवाव्यात याबद्दल कोणतीही स्पष्ट आणि अनिवार्य संख्या सांगितलेली नाही. कोणत्याही प्रमुख शैवग्रंथात हे सांगितलेले नाही. त्यामुळे, पूजेदरम्यान टाळ्या वाजविणे ही एक भावनिक परंपरा आहे, अनिवार्य धार्मिक नियम नाही. लोकपरंपरांमध्ये ३ वेळा टाळी वाजविण्याचा समावेश आहे. जर मंदिरात किंवा परंपरेनुसार शांत मनाने ध्यान केले जात असेल, तर त्याच नियमांचे पालन करणे योग्य मानले जाते.

### पूजेदरम्यान टाळ्या का वाजविल्या जातात?

ज्योतिषी स्पष्ट करतात, की भारतीय सनातन परंपरेत, टाळ्या वाजविणे हा केवळ उत्साह व्यक्त करण्याचा एक मार्ग नाही. आरती, भजन आणि कीर्तनादरम्यान हे आनंद, भक्ती आणि ईश्वरामध्ये पूर्ण सहभागाचे प्रतीक मानले जाते. जेव्हा भक्त देवाची स्तुती गाताना टाळ्या वाजवितात, तेव्हा त्यांचे मन, वाणी आणि शरीर एकाच वेळी उपासनेत मग्न होतात. म्हणूनच सामूहिक भजन आणि आरतीमध्ये टाळ्यांना विशेष महत्त्व आहे.

### ३ टाळ्यांचा अर्थ

पहिली टाळी : धार्मिक मान्यतेनुसार, अहंकार, क्रोध आणि नकारात्मक विचार देवाच्या चरणी समर्पित करण्याची एक खूण.
दुसरी टाळी : भगवान शिवाप्रती पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आत्मसमर्पणाचे प्रतीक.
तिसरी टाळी : तुमच्या कुटुंबासाठी, समाजासाठी आणि संपूर्ण विश्वासाठी सुख, शांती आणि कल्याणाची कामना.
तुम्ही यापेक्षा जास्त किंवा कमी टाळ्या वाजवल्या तरी, पूजेचे फळ संख्येवर नाही, तर भक्ती आणि भावनेवर अवलंबून असते.

### शिवलिंगासमोर टाळी वाजविण्याचे फायदे

धार्मिक मान्यतेनुसार शिवलिंगासमोर टाळी वाजविल्याने पूजा आणि आरतीच्या वेळी मनाची एकाग्रता वाढते. यामुळे भक्ती, उत्साह आणि सकारात्मक भावना निर्माण होतात. यामुळे सभोवताली एक सद्गुणी वातावरण निर्माण होण्यास मदत होते. भक्ताचे लक्ष भगवान शिवजींवर अधिक केंद्रित होते.

# शिवलिंगासह भगवान शिवजींचे त्रिशूळ का नसते?

## काय आहे यामागील गूढ रहस्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शिवजींची अनेक रूपे आहेत, ते बहुतेक शिवलिंग स्वरूपात दिसतात. परंतु त्यांचे शस्त्र त्रिशूल शिवलिंगासोबत कधीच दिसत नाही. हे असे का आहे? याबद्दल सविस्तर जाणून घेऊया, काय आहे रहस्य?

महाशिवरात्रीचा सण प्रत्येक शिवभक्तांसाठी विशेष महत्त्वाचा आहे. भगवान शिवजी यांना समर्पित या उत्सवात शिवलिंगाची पूजा मोठ्या प्रमाणात केली जाते. आज आपण शिवलिंग आणि शिवजी मंदिराशी संबंधित एक मनोरंजक गोष्ट जाणून घेऊया. खरेतर जेव्हा तुम्ही शिवालयात किंवा शिवमंदिरात जाता किंवा शिवलिंग घरी आणता तेव्हा तुम्हाला एक विचित्र गोष्ट लक्षात आली असेल. शिवलिंगासोबत किंवा बहुतेक शिवमंदिरांमध्ये त्रिशूळ नसतो. शिवजींची सर्वांत जवळची गोष्ट आणि भगवान शिवजींची ओळख असणारी महत्त्वाची गोष्ट त्रिशूळ हे कधीच शिवलिंगसह नसते. असे का? त्याचे नक्की काय रहस्य आहे?

### शिवजींच्या त्रिशूळाबाबत माहिती

जेव्हा भगवान शिवजींच्या मंदिरात जाता तेव्हा जेथे शिवलिंग आहे तेथे नेहमीच तुम्ही पाहिले असेल की शिवलिंगावर असणाऱ्या कलशातून शिवलिंगावर पाण्याचा अभिषेक होत असतो आणि त्यावर नागछत्र दिसत आहे. शिवलिंगासोबत संपूर्ण शिव परिवार म्हणजेच माँ पार्वती, भगवान कार्तिकेय, अशोकसुंदरी आणि श्रीगणेशजी देखील दिसतात. पण शिवलिंगासोबत शिवजींचे शस्त्र त्रिशूळ का दिसत नाही? हे असे का आहे?

धार्मिक श्रद्धेनुसार त्रिशूळ आणि शिवलिंग हे दोन्ही महादेवांचे प्रतीक आहेत. परंतु त्यांची ऊर्जा आणि महत्त्व वेगळे आहे. त्रिशूळ हे विनाश आणि शक्तीचे प्रतीक मानले जाते. दुसरीकडे निर्मिती आणि प्रजननक्षमतेचे प्रतीक असलेल्या शिवलिंगाची ऊर्जा त्रिशूळापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. अशा परिस्थितीत या दोन वेगवेगळ्या शक्तींमध्ये टक्कर होऊ शकते; म्हणून या दोन्ही कधीच शिवलिंगाच्या ठिकाणी एकत्र ठेवल्या जात नाहीत.

### त्रिशूळ न ठेवण्याचे कारण

शिवलिंगासोबत त्रिशूळ न ठेवण्यामागील कारण म्हणजे त्रिशूळ भगवान शिवजींच्या भौतिक स्वरूपाशी संबंधित आहे. परंतु शिवलिंग हे भगवानांच्या आध्यात्मिक आणि निराकार स्वरूपाचे प्रतिनिधित्व करते. जर त्रिशूळ भगवान शिवजींच्या मूर्तीसोबत दिसला तर ते भगवानाचे तीन मुख्य गुण दर्शविते आणि ते म्हणजे सत्य, ज्ञान आणि अनासक्ती जे शिवजींच्या संपूर्ण अस्तित्वाचे प्रतीक म्हणून पाहिले जातात. त्रिशूळाचे तीन टोक विश्वाच्या तीन मुख्य पैलूंचे प्रतिनिधित्व करतात जसे की निर्माता, म्हणजेच ब्रह्मा, पालनकर्ता, म्हणजेच भगवान विष्णू आणि संहारकर्ता, म्हणजेच महेश. म्हणूनच हे शिवलिंगासह दिसत नाही.

### ३ शूळ कशाचे प्रतीक

शिवलिंग हे भगवान शिवजींचे निराकार रूप दर्शवते. जे विश्वाच्या ऊर्जेचे आणि निसर्गाचे मिलन दर्शविते. त्रिशूळ हे भगवान शिवजींच्या तीन पैलूंचे प्रतिनिधित्व करते ते म्हणजे निर्माता, पालनकर्ता आणि संहारकर्ता. यामुळेच त्रिशूळाकडे महादेवांच्या शक्ती आणि नियंत्रणाचे प्रतिनिधित्व म्हणून पाहिले जाते.


# केदारनाथ पाच भागांत विभागलेले? 'हे' आहे रहस्य..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तराखंडमधील केदारनाथ गावात मंदाकिनी नदीच्या काठावर केदारनाथ मंदिर बांधण्यात आले आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक, पंचकेदार व छोटा धाम या अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्रांपैकी केदारनाथ एक मानले जाते. हिमालय पर्वतांमध्ये असलेल्या केदारनाथ मंदिराची उभारणी पांडवांनी केली असून, आद्य शंकराचार्यांनी या मंदिराचे पुनरुज्जीवन केले, अशी मान्यता आहे. गौरीकुंडहून चौदा कि.मी. अंतराचा खडतर प्रवास करूनच केदारनाथ मंदिरापर्यंत पोहोचता येते आणि केदारनाथांचे दर्शन घेता येते. २०१३ मध्ये उत्तराखंडमध्ये आलेल्या विध्वंसक पुरामध्ये केदारनाथ गाव पूर्णपणे वाहून गेले. मात्र, दगडी केदारनाथ मंदिराला किंचितसा धक्काही पोचला नाही, हे आपण सर्वांनीच पाहिले. सहा महिने हे मंदिर पूर्ण बर्फाच्छादित असते. अक्षय्य तृतीयेच्या मुहुर्तावर किंवा त्या आसपास हे मंदिर भाविकांसाठी खुले केले जाते. केवळ सहा महिने हे मंदिर भाविकांसाठी खुले असते. करोना विषाणू संसर्गाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सध्या हे मंदिर भाविकांसाठी बंद आहे. केदारनाथ मंदिर हे दररोजच्या पूजा-अर्चेसाठी खुले करण्यात आले असून, मोजक्या लोकांना येथे प्रवेश देण्यात आला आहे. केदारनाथ मंदिर पाच भागात विभागले गेले असल्याचे सांगितले जाते. या मंदिराचा आणि पांडवांचा काय संबंध? या मंदिराचे पाच भाग कुठे आहेत? जाणून घेऊया...

### शिवाचे वृषभ रूप

महादेव शिवशंकर यांचे दर्शन घेण्यासाठी पांडव हिमालयात गेले. मात्र, शिवशंकर त्यांना दर्शन देण्यास इच्छुक नव्हते. पांडवांना समजू नये, यासाठी त्यांनी वृषभ रूप धारण केले आणि प्राण्यांच्या एका कळपात सहभागी झाले.



भीमाला ही गोष्ट समजली. त्याने विशालकाय देह धारण केला. तेव्हा अन्य प्राणी भीमाच्या दोन पायांमधून निघून गेले. मात्र, शिवनाथ तेथेच राहिले. तेव्हा भीमाने वृषभाच्या पाठीवरील वशिंड धरले. पांडवांचा दृढ संकल्प पाहून शिवशंकरांनी आपला निश्चय बदलला आणि पांडवांना त्यांनी दर्शन दिले. पांडवांना त्यांच्या सर्व पापांतून मुक्ती मिळाली. वृषभाच्या पाठीवरील वशिंडाच्या आकारात असलेल्या शिवलिंगाची पूजा केदारनाथ मंदिरात केली जाते.

### पंच केदारनाथचे रहस्य

शिवशंकर वृषभाचा अवतार घेऊन अंतर्धान पावले, तेव्हा त्यांच्या शरीराचा वरचा भाग पशुपतीनाथांच्या रूपाने नेपाळमधील काठमांडू येथे प्रकट झाला. शिवजींच्या भुजा तुंगनाथ येथे, तर मुख रुद्रनाथ येथे प्रकट झाले. महादेवांची नाभी मदमहेश्वर येथे, तर जटा कल्पेश्वर येथे प्रकट झाल्या. शिवजींच्या पाठीचा भाग केदारनाथ येथे आहे. म्हणूनच या पाच ठिकाणांना 'पंचकेदार' असे म्हटले जाते. या पाचही ठिकाणी महादेवांची भव्य मंदिरे आहेत, असे सांगितले जाते.

### मदमहेश्वर मंदिर

पांडवांना दर्शन देण्यासाठी घेतलेल्या वृषभ रूपातील महादेवांची नाभी मदमहेश्वर येथे प्रकट झाली, तेथे एक भव्य मंदिर असलेले पाहायला मिळते. समुद्रसपाटीपासून ३,२८९ मीटर उंचीवर हे मंदिर आहे. मदमहेश्वर हे मंदिर दुसरे केदारनाथ मंदिर म्हणून ओळखले जाते. या मंदिरातील शिवलिंगाची पूजा नाभिलिंगम स्वरूपात केली जाते. हिवाळ्यात सहा महिने हे मंदिर भाविकांसाठी बंद ठेवण्यात येते. मदमहेश्वर मंदिरापर्यंत जाण्यासाठी रुद्रप्रयाग जिल्ह्यातील ऊखीमठ येथून वाहने उपलब्ध आहेत.

### तुंगनाथ मंदिर

उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील एका पर्वतावर तुंगनाथ मंदिर आहे. या मंदिराची उंची समुद्र सपाटीपासून ३,६८० मीटरवर आहे. या मंदिरात शिवशंकरांच्या भुजांची पूजा केली जाते. कुरुक्षेत्रावर झालेल्या प्रचंड नरसंहारामुळे महादेव पांडवांवर नाराज झाले होते. शिवजींला प्रसन्न करण्यासाठी पांडवांनी या मंदिराची उभारणी केली, असे सांगितले जाते. आणखी एका पौराणिक मान्यतेनुसार शिवजींना प्रसन्न करण्यासाठी माता पार्वतींनी याच पर्वतावर तपस्या केली होती. हे मंदिर पंच केदारनाथपैकी एक आहे.

### रुद्रनाथ मंदिर

वृषभ रूपातील शिवशंकर यांचे मुख रुद्रनाथ येथे प्रकट झाले होते, अशी पौराणिक मान्यता आहे. उत्तराखंडात असलेल्या चमोली जिल्ह्यात हे मंदिर उभारण्यात आले असून, रुद्रनाथांचे मंदिर समुद्रसपाटीपासून सुमारे २,२९० मीटर उंचीवर असल्याचे सांगितले जाते. या मंदिरात शिवशंकरांची मोठ्या प्रमाणात आराधना केली जाते. या मंदिरात पूजल्या जाणाऱ्या शिवशंकरांच्या मुखाला निळकंठ महादेव, असेही संबोधले जाते. पंच केदारनाथांपैकी असलेले हे मंदिरही भव्य असेच आहे. या मंदिराभोवती असलेला निसर्ग मन मोहून टाकणारा आहे.

### कल्पेश्वर मंदिर

उत्तराखंडात असलेल्या चमोली जिल्ह्यातील उर्मगम घाटी येथे कल्पेश्वर मंदिर आहे. पंच केदारनाथांपैकी हे पाचवे स्थान आहे. या मंदिराची उंची समुद्र सपाटीपासून सुमारे २,२०० मीटरवर असल्याचे सांगितले जाते. पंच केदारनाथांपैकी हे एकमेव मंदिर आहे, जे बाराही महिने भाविकांसाठी खुले असते. अन्य मंदिरे हिवाळ्यात बर्फाच्छादित होत असल्यामुळे काही महिने भाविकांसाठी खुली करण्यात येतात. हे मंदिर एका गुहेत उभारण्यात आले आहे. या ठिकाणी महादेवाच्या जटा प्रकट झाल्या होत्या, अशी मान्यता आहे. त्यामुळे या मंदिरात शिवांच्या जटांची पूजा केली जाते.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)